अर्ज दाखल ता. / १ /२०२६

Exh- 1/C

दै. रजि. नं. /२०२६

कौ.हि.म.स अर्ज नं. 4 /२०२६

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल
# यांचे कोर्टात ...

**१. सौ. अश्विनी सागर ठाकूर**
व.व. ३६, धंदा : काही नाही,
**२. प्रशांत सागर ठाकूर**
व.व. ८, धंदा : शिक्षण
दोघेही रा. व्दारा : श्री. दिनकर थळू कांबळे,
रा. वाळवे खुर्द, ता. कागल,
जि. कोल्हापूर. — अर्जदार

**विरूध्द**

**१. सागर वसंत ठाकुर**
व.व. ४१, धंदा : नोकरी,
रा. कुर्डू ता. करवीर,
जि.कोल्हापुर — वि.प.

Order
Issue Notice to opponent
through P.O. Kagal
JMFC,
Kagal

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ प्रमाणे व अन्य कलम १७, १८, २० व २२ प्रमाणे आदेशासाठी अर्ज.**

**प्रस्तुत अर्जदार मे. कोर्टास कळवितात ते खालीलप्रमाणे–**

१) यातील अर्जदार व वि.प. हे नात्याने पती – पत्नी आहेत. त्यांचा विवाह बौध्द धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे दि. २५/०६/२०१६ इ. रोजी मौनीनगर साखर कारखाना कामगार सेवकांची पत संस्था हॉल

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

बिद्री, ता. कागल येथें झालेला आहे. सदर विवाहात अर्जदार यांचे घरचे लोकांनी अर्जदार यांना अर्धा तोळे मनी मंगळ सुत्र व वि.प. यांनी अर्धा तोळा मनी मंगल सुत्र लग्नामध्ये घातले होते. तसेच वि.प. यांचे आई –वडिल, भाऊ यांचा योग्य तो मानपान केलेला आहे. सदर लग्नाचा सर्व खर्च अर्जदार यांचे आई–वडिलांनी केलेला आहे.

२) सदरचे लग्नानंतर अर्जदार हया कुर्डु, ता.करवीर, जि.कोल्हापुर येथे नांदावयास गेल्या. लग्नानंतर अर्जदार यांना सुरुवातीचे काही दिवस व्यवस्थीत नांदवले. वि.प. हे तळोदा, जि.नंदुरबार येथे प्राध्यापक म्हणून नोकरीस असलेने लग्नानंतर ते नोकरीचे ठिकाणी नंदुरबार येथे निघुन गेले. अर्जदार हया सासरीच म्हणजे कुर्डु येथे राहील्या. त्यांनतर ६ महिन्यानी अर्जदार नं. १ हया वि.प. नोकरी करत असलेल्या ठिकाणी नोव्हेंबर २०१६ मध्ये तळोदा, जि. नंदूरबार येथे राहणेस गेल्या. तेथे राहणेस गेले असता वि.प. हे अर्जदार यांना शेजारील महीलांशी फार बोलायचे नाही असे म्हणत असत, त्यांवेळी अर्जदार यांनी वि.प. यांना असे का विचारले त्यावेळी वि.प. हे बोलत असत की इथल्या बायका चांगल्या नाहीत. वि.प. यांचे म्हणणेप्रमाणे अर्जदार हया तेथे इतर महिलांशी बोलतही नसत व कधीही खोलीतून बाहेर पडत नव्हत्या. तसेच वि.प. यांचे पासून अर्जदार यांना दिवस गेले सदरची गोष्ट अर्जदार यांनी वि.प. यांना आपण गरोदर असलेचे सांगितले असता, वि.प. म्हणाले की, एवढया लवकर मुल नको असे म्हणून त्रास देण्यास सुरवात केली व अर्जदार यांना दावाखाना औषधोपचार करणेस नकार दिला परंतु अर्जदार नं. १ यांनी पहिले बाळ होऊदे असे म्हटलेने परंतु वि.प. यांनी अर्जदार नं. १ यांना योग्य तो उपचार देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे अर्जदार यांना वि.प. यांनी मानसिक व शारिरीक त्रास दिला.

३) त्यांनतर मे. २०१७ मध्ये अर्जदार व वि.प. यांना गावी यायचे होते, त्यावेळी अर्जदार हया ७ महिन्याचे गरोदर होत्या वि.प. म्हणाले की

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

माझ्या मित्राच्या गाडीतून जाऊया त्याप्रमाणे अर्जदार व वि.प. त्यांचे मित्र व त्यांची पत्नी सह कुर्डु, ता.करवीर गावी आले.

४) त्यांनंतर अर्जदार हया आपले माहेरी वाळवे खुर्द येथे ओटीभरणीसाठी आल्या त्यानंतर वि.प. हे अर्जदार नं. १ यांना फोन करुन ओटीभरणीचे वेळी माझा व माझ्या घरातील लोकांचा योग्य तो मानपान केला पाहिजे. तसेच वि.प. यांचा फोन काही कारणास्तव वेळ झाला तरी वि.प. हे अर्जदार नं. १ यांना शंका घेऊन अश्लिल भाषेमध्ये शिवीगाळ करत असत. कोणापर पुरुषा बरोबर आहेस असे म्हणुन मानसिक त्रास देत होते. त्यांनंतर अर्जदार नं. १ यांच्या आई वडिलांनी अगदी साध्या पध्दतीने ओटीभरणीचा कार्यक्रम केला त्यांनंतर अर्जदार नं. १ हया सासरी नांदावयास गेल्या. त्यांवेळी वि.प. व त्यांचे घरातील लोकांनी ओटीभरणीचा कार्यक्रम साध्या पध्दतीने केला व आमचा योग्य तो मानपान केला नाही. यां कारणास्तव मानसिक त्रास देण्यास सुरवात केली दरम्यानचे काळात वि.प.यांचेपासून अर्जदार यांना दि. २७/०७/२०१७ इ रोजी कु. प्रशांत व.व. ८ हा मुलगा झाला. सदर डिलेव्हरीचा सर्व खर्च अर्जदार यांचे आई–वडिलांनी केलेला आहे. यातील वि.प. यांनी केलेल्या त्रासामुळे व गरोदरपणामध्ये त्रास दिलेमुळे कु. प्रशांत हा जन्मजात अपंग जन्माला आला. यातील वि.प. हे मुलगा प्रशांत हा जन्मजात अपंग जन्माला आलेने जाणिवपुर्वक अर्जदार यांना माहेरी पाहावयास येत नव्हता. वेगवेगळी कारणे सागुन अर्जदार यांना पाहण्यास येत नव्हता. त्यानंतर कु. प्रशांत हा ४ महिन्याचा झाले नंतर वि.प. सोबत अर्जदार हया तळोदा येथे राहावयास गेल्या.

५) यातील वि.प. हे अर्जदार यांचे चारित्र्यावर संशय घेवुन अर्जदार नं. १ यांना दारु पिऊन मारहाण करीत होते. तसेच अर्जदार यांना घराच्या बाहेर घालवुन स्वता घरामध्ये आत कडी लावुन बसत असत व अर्जदार यांना घराच्या बाहेर बसवत असत. अशा पध्दतीने वि.प. हे अर्जदार यांचा छळ करत होते. त्यांनतर वि.प.हे अर्जदार यांना काही वेळा कुर्डु येथे

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

सोडुन जात होते. त्यानंतर वि.प. यांना तळोदा येथील नोकरी नकोशी झालेने अर्जदार व वि.प. हे तळोदा येथुन साहित्य घेवुन येत असताना वि.प. यांनी अर्जदार यांचे वर संशय घेवुन मारहाण करीत गावी घेवुन आले. त्यावेळी तळोदा येथील घर भाडे बरेच वेळा अर्जदार यांच्या वडिलानी दिलेले आहे व साहित्य आणतेवेळीचे भाडेचे वाहनाचे भाडे ही अर्जदार यांच्या वडिलांनी दिलेले आहे. त्यावेळी वि.प. यांनी अर्जदार नं. १ यांना नांदावयास नेणेस नकार दिला व कोल्हापुर येथुनच माहेरी पाठवुन दिले. यातील वि.प. व त्यांच्या घरातील लोकांनी अर्जदार नं. १ यांचा छळ केले बाबत अर्जदार यांनी दि. १७/०८/२०२२ इ. रोजी भारतीय दंड संहिता कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ व ३४ अंतर्गत इस्पुर्ली पोलिस स्टेशन ता. करवीर येथे गुन्हा दाखल केलेला आहे. सदरचा गुन्हा दाखल केले नंतरही यातील वि.प. यांनी अर्जदार नं. १ यांना फोन वरुन शिवीगाळ करुन अश्लिल मॅसेज पाठविले व मनास लज्जा उत्पन्न होईल अशी शिवीगाळ केली. त्यानंतर अर्जदार नं. १ यांनी सदर कृत्याबाबत मुरगुड पोलिस स्टेशन येथे दि. ०९/११/२०२२ इ. रोजी भारतीय दंड संहिता कलम २९४, ५०७ व ५०९ प्रमाणे गुन्हा रजि. नं. १८० /२०२२ चा तक्रार दाखल केली.

६) वि.प. नी अर्जदार नं. १ यांना माहेरी पाठविले पासुन त्यांच्या पोटापाण्याची कोणतीही चौकशीही केली नाही याउलट वि.प. हे घरी ऐशआरामात जगत असून अर्जदार नं. १ यांच्या आई–वडीलांची अर्थिक परिस्थिती नसलेने अर्जदारांचेवर उपासमारीची वेळ आलेले आहे. यातील अर्जदार नं. २ यांचा सांभाळ करावा लागत असलेने अर्जदार नं. १ यांना कोणताही काम धंदा करता येत नाही. यातील अर्जदार नं. २ हा इयत्ता २ री मध्ये विदया मंदिर वाळवे मध्ये शिकत आहे. त्यांला वेळोवेळी औषधोउपचाराची गरज आहे. यातील अर्जदार नं. २ यांना पायाने चालता येत नसलेने त्यांचे वरती आधार हॉस्पीटल इंचलकजी येथे ऑपरेशन केलेले आहे. सदर ऑपरेशन साठी रक्कम रु ७५,०००/–

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

इतका खर्च आला. सदरची रक्कम यातील अर्जदार यांनी त्यांचे वडिलाचेकडुन हात उसने घेतलेले आहेत. सदरची रक्कम देणेची जबाबदारी वि.प. यांची आहे. सदरची रक्कम वि.प. यांनी अर्जदार यांना देणे लागत आहे.

७) यातील वि.प. यांनी अर्जदार हे माहेरी आले पासुन उदरनिर्वाहाची व औषधपाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. वि.प. हे उच्च शिक्षित असुन सध्या नोकरी करत आहेत. त्यांना सदर नोकरीतुन दरमहा १,००,०००/—इतका पगार मिळतो. वि.प. यांचे वडिल रिटायर्ड मिलीटरी असुन त्यांना पेंशन मिळत असलेने वि.प. यांचे वर त्यांची जबाबदारी नाही. वि.प.यांची कुर्दु गावी येथे या गावी २ एकर बागायत जमीन असून त्यातुन वि.प. यांना २,००,०००/— इतके उत्पन्न मिळते वि.प. यांच्या कुटूंबाची अर्थिक परिस्थिती चांगली आहे तरी देखील वि. प. हे जाणूनबूजून अर्जदार यांचा त्याग करून त्यांची उदरनिर्वाहाची सोय केलेली नाही. अर्जदार यांची सर्व जबाबदारी सर्वस्वी वि.प. यांचेवर आहे. वि.प. यांची अर्थिक परिस्थीती चांगली असल्याने अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रू. १५,०००/— इतकी पोटगी देणेसारखी आर्थिक कुवत आहे. याकरीता अर्जदार यांना प्रस्तुतचे काम दाखल करणे भाग पडले आहे.

८) <u>**अर्जास कारण :**</u>यातील वि.प. यांनी लग्न झालेपासुन अर्जदार यांचा चारित्र्यावर सशंय घेवुन शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. व अर्जदार यांना माहेरी पाठुवुन दिले पासुन त्यांच्या उदरनिर्वाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी अर्जास कारण घडले आहे.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

९) **ज्युरिसडिक्शन** :यातील अर्जदार हे मे. कोर्टाच्या स्थळसिमेत रहात असलेने प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात चालविणेचा व निर्णय देणेचा मे. कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

१०) प्रस्तुत अर्जदार व वि.प. यांचे दरम्यान अन्य कोणताही दावा प्रलंबित नाही.

११) **सबब, अर्जदार यांची विनंती की,**

अ) अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम २००५ आणि २००६ प्रमाणे अर्जदार यांना वि.प. यांनी त्रास दिलेने व कायदयाविरूध्द वागलेने यातील वि.प. यांना जास्तीत जास्त व कडक शासन व्हावे.

क) अर्जदार यांना उदरनिर्वाहाची पोटगी म्हणून प्रत्येकी दरमहा रक्कम रू. १५,०००/— प्रस्तुत अर्जाचे तारखेपासून अदा करणेबाबत वि.प. यांचेविरूध्द योग्य ते आदेश व्हावेत.

ड) अर्जदार यांना दरमहा रू. ५०००/— निवास भाडेपोटी प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासून अदा करणेबाबत वि.प. यांचेविरूध्द आदेश व्हावेत.

ई) यातील अर्जदार नं. २ यास दवाखान्याचा आलेला खर्च रक्कम रु ७५,०००/— वि.प. यांनी दयावा असा आदेश व्हावा.

उ) अर्जदार व तिचे नातलगांना वि.प.कडून कोणत्याही प्रकारे त्रास, दमदाटी होऊ नये, अर्जदार राहत असलेल्या ठिकाणी येऊ नये व

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

अर्जदार यांना फोन वरुन अश्लिल मॅसेज पाठवु नये अगर कॉल करु नये म्हणून आवश्यक ते संरक्षणाचे सर्व आदेश संबंधित पोलीस खात्यास व संरक्षण अधिकारी यांना देणेत यावेत.

ऊ) वि.प. यांचे वर्तनामुळे अर्जदारांना झालेल्या मानसिक व अमानुष छळपोटी नुकसान भरपाई म्हणून रू. २,००,०००/— वि.प. यांचेकडून अर्जदारांना मिळणेबाबत आदेश व्हावा.

प) या अर्जाचा कोर्ट खर्च रक्कम रू. १०,०००/— वि.प. यांचेकडून अर्जदाराला मिळावा.

फ) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

भ) अन्य ते न्यायाचे हुकूम याचकामी अर्जदार यांचे बाजूने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल

ता.२२/१/२०२६

Asthakur

अर्जदार नं. १ व अर्जदार नं. २ अ.पा.क. करिता.

अर्जदार यांचे सुचनेवरून तयार करून दाखल करणार

ॲड. एम. बी. पाटील.

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार नं. १ अश्विनी सागर ठाकुर, स्वता करीता व कु. प्रशांत करीता सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील अर्जामधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता.२२/१/२०२६

Asthakur

अर्जदार नं. १ स्वत: करीता व अर्जदार नं. २ अ.पा.क. करीता.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार नं. १ अश्विनी सागर ठाकुर, स्वता करीता व कु. प्रशांत करीता व.व. ३६, धंदा : काही नाही, रा. व्दारा : श्री. दिनकर थळु कांबळे, रा. वाळवे खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर. सत्य शपथपूर्वक ॲफिडेव्हीट करते की, वरील अर्जामधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता.22/1 /२०२६

ॲफिडेव्हीट करणार यांना
मी ओळखतो.

ॲड. एम.बी. पाटील.

Asthakur
अर्जदार नं. 1 स्वता करीता व अर्जदार नं. 2 अ.पा.के. करीता.

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार नं. १ अश्विनी सागर ठाकुर, स्वता करीता व कु. प्रशांत करीता सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील अर्जामधील व त्याखालील ॲफिडेव्हीटमधील लिहीला संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. 22/1/2026.

Asthakur
अर्जदार नं. 1 स्वता करीता व अर्जदार नं. 2 अ.पा.के. करीता.

Solemnly Affirmed before me by
Smt. Ashwini Sagar Takur
Age 36 of Walve Kagal who is
identified by Smt. M.B. Patil Adv
............whom I know personally
Dated :- 22/1/26

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.04 17:48:29 +0530